274

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २६/०२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एनएएक्स-०२२३/प्र.क्र.५०/विशा-१ब, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४.

**विषय :-** PFMS प्रणाली अंतर्गत सुरक्षाविषयक खर्च योजनेचा केंद्र व राज्य हिश्श्याचा निधी सदर योजनेच्या SNA खात्यामध्ये जमा करण्याबाबत

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. एनएएक्स-०२२३/प्र.क्र.५०/विशा-१ब, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०२२३१८०१५५१२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान,नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर.
पोलीस अधीक्षक, गडचिरोली / गोंदिया/ विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

PFMS प्रणाली अंतर्गत सुरक्षाविषयक खर्च योजनेचा केंद्र व राज्य हिश्श्याचा निधी सदर योजनेच्या SNA खात्यामध्ये जमा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक- एनएएक्स-०२२३/प्र.क्र.५०/विशा- १ ब,
दुसरा मजला, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक - २३ फेब्रुवारी, २०२४.

वाचा-

१. केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे पत्र क्र. १(१३)/PFMS/FCD/२०२०, दि. २३/३/२०२१.
२. केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे पत्र क्र. ११-१८०१५/०९/२०२२-LWE-III, दि. २५/४/२०२२.
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र. ३५/कोषा प्रशा-४, दि. १/७/२०२१.
४. गृह विभाग, शासन निर्णय क्र. योजना २०२१/प्र.क्र. ४५/अर्थ-१, दि. १/७/२०२२.
५. US, Govt. of India No.- II-१८०१५/०६/२०२३-LWE-III, दि.२०.६.२०२३.

**प्रस्तावना-**

केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधीचे परिणामकारक व्यवस्थापन करणे तसेच, निधी विनियोगाच्या प्रक्रियेत अधिक परिणामकारकता आणण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने संदर्भ क्र. १ व क्र.२ वरील आदेशान्वये केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी Public Finance Management System (PFMS) द्वारे वितरीत करण्यासाठी सुधारित कार्यपध्दतीचा अवलंब करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन वित्त विभागाने संदर्भ क्र. ३ वरील शासन परिपत्रकान्वये केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधी वितरणासाठी PFMS चा वापर करण्याच्या अनुषंगाने सूचना दिलेल्या आहेत.

२. त्यानुसार गृह विभागाच्या केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीसाठी संदर्भ क्र. ४ वरील शासन निर्णयान्वये नोडल अधिकारी व प्रत्येक केंद्र पुरस्कृत योजनेकरिता Single Nodal Agency (SNA) ची नेमणूक करण्यात आली आहे. सुरक्षा विषयक खर्च (Security Related Expenditure) योजनेसाठी उप सचिव (विशा-१ ब), गृह विभाग यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांचे Single Nodal Agency (SNA) खाते स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये उघडण्यात आले आहे.

३. यानुषंगाने नमूद करण्यात येते की, आतापर्यंत सदर योजनेंतर्गत BEAMS प्रणालीवर निधी वितरीत करण्यात येत होता व तद्नंतर संबंधित कार्यालयांच्या DDO यांना निधी वितरीत केला जात होता. त्यानंतर संबंधित DDO कडून संबंधितांना देयके अदा करण्यात येत होती.

४. आता, केंद्र शासनाच्या दि. २३/३/२०२१ व दि. २५/४/२०२२ च्या पत्रातील निर्देशानुसार चालू वित्तीय वर्ष २०२३-२४ मध्ये BEAMS प्रणालीवरील निधी PFMS अंतर्गत SNA खात्यावर जमा करणे आवश्यक आहे. वित्तीय वर्ष २०२३-२४ मध्ये विशेष केंद्रीय सहाय्य योजना अंतर्गत वित्त विभागाने बिम्स प्रणालीवर खर्चासाठी उपलब्ध करुन दिलेला निधी SNA खात्यामध्ये जमा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

Scanned with CamScanner

**शासन निर्णय:-**

केंद्र पुरस्कृत योजनांसाठीचा निधी PFMS प्रणालीद्वारे वितरीत करण्याबाबत केंद्र शासनाच्या निदेशानुसार सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील मंजूर तरतूदीतून BEAMS प्रणालीवरील केंद्र शासनाचा ६०% व राज्य शासनाचा ४०% हिस्सा अशी तरतुद आहे. त्यामुळे केंद्र शासनाने मंजूरी दिलेल्या वार्षिक कृती आराखडयानुसार सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात विधानमंडळाच्या डिसेंबर-२०२३ हिवाळी अधिवेशनात बाब क्रमांक-२२ अन्वये वित्त विभागाने रु.४,७३,९९,०००/- इतकी पुरवणी मागणी मंजूर केली असून सदर निधी PFMS अंतर्गत या योजनेच्या SNA खात्यामध्ये जमा करण्याची मान्यता केंद्र शासनाने दि.२३.३.२०२१ व दि. २५/४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना/अटी व शर्तींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२. सदरची मान्यता केंद्रीय गृह मंत्रालयाच्या मान्यतेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. तसेच PFMS अंतर्गत या योजनेच्या SNA खात्यामध्ये जमा करण्यात येणाऱ्या निधीचा तपशील खालीलप्रमाणे असून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात उपलब्ध अनुदानातून भागविण्यात येईल.

| लेखाशीर्ष | उद्दिष्ट | अर्थसंकल्पीत तरतूद | SNA खात्यावर जमा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|
| मागणी क्र.- बी-१, २०५५, पोलीस (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०८) नक्षलग्रस्त भागातील सुरक्षा विषयक खर्च (६०% केंद्र पुरस्कृत) (कार्यक्रम), | ३१ - खर्च अनुदाने (२०५५ ०४८२) सशर्त | ४,७३,९९,०००/- | ४,७३,९९,०००/- |
| | | एकूण | ४,७३,९९,०००/- |

३. "सुरक्षाविषयक खर्च योजना" या योजनेसाठी SNA खात्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| | |
|---|---|
| खात्याचे नाव | Security Related Expenditure |
| बँकेचे नाव | स्टेट बँक ऑफ इंडिया |
| शाखा | मंत्रालय |
| IFSC Code | SBIN००६१५२४ |
| बँक खाते क्रमांक | ४११७३१३९०८६ |

४. सदर रक्कम आहरित करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून कक्ष अधिकारी/अवर सचिव (रोख शाखा), गृह विभाग तसेच नियंत्रक अधिकारी म्हणून उपसचिव/सह सचिव (रोख शाखा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आली आहेत.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१२५/२०२४/व्यय-७, दि.०८.०२.२०२४ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.



Scanned with CamScanner

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२२३१८०१५५१२२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAJESH SHALIGRAM GOVIL

Digitally signed by RAJESH SHALIGRAM GOVIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=c549410b2251df8c92783a2da17afcacbe7f8fe3a4fd88f156fea64413871f11, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=0ED8916DB8E68105B4125438A1605D0F12978EECB0C9464E868A33D643272018, cn=RAJESH SHALIGRAM GOVIL
Date: 2024.02.23 18:11:35 +05'30'

(राजेश गोविल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई / नागपूर.
३. अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. विशेष पोलीस महानिरीक्षक (नक्षल विरोधी अभियान), नागपूर.
५. पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, नागपूर.
६. पोलीस अधीक्षक, गडचिरोली / गोंदिया.
७. अधिदान व लेखाधिकारी, नागपूर / गडचिरोली / गोंदिया.
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, नागपूर / गडचिरोली / गोंदिया.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर / गडचिरोली / गोंदिया.
१०. अवर सचिव (रोख शाखा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कक्ष अधिकारी अर्थ-१/पोल-७, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. कक्ष अधिकारी, व्यय-७/अर्थोपाय/अर्थ-११, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. संग्रहार्थ नस्ती / निवडनस्ती (वि.शा. १ ब)



Scanned with CamScanner